# सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्ती (एमआयटीसी)

कर्जदार आणि हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी कायदा १९५६ अंतर्गत स्थापन झालेली आणि रॅमन हाऊस, एच.टी. पारेख मार्ग, १६९, बॅकबे रेक्लेमेशन, चर्चगेट, मुंबई ४०० ०२० येथे नोंदणीकृत कार्यालय असणारी व यापुढे ''एचडीएफसी'' म्हणून ओळखली जाणारी कंपनी यांच्यामधील कर्जाच्या अटी आणि शर्ती खाली दिल्यानुसार संमत करण्यात आल्या असून त्या पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत :

१. कर्ज

मंजूर केलेली रक्कम :

२. व्याज

(i) प्रकार :

(ii) लावण्यात येणारे व्याज :

(iii) कर्जाची परतफेड पुढे ढकलण्याचा अधिकार किंवा आर्थिक मदत :

(iv) व्याज नव्याने लागू करण्याची तारीख :

(v) व्याजदरामधील बदल सूचित करण्याच्या पद्धती : एचडीएफसी हे रिटेल प्राइम लेन्डिंगमधील अशा प्रकारचे बदल भारतातील सर्वात आघाडीवरील वर्तमानपत्रांमध्ये ''प्रेस रिलिज'' द्वारे आणि त्यांच्या वेबसाईट www.hdfc.com वरून कळवितात.

३. हप्त्यांचा प्रकार : मासिक

४. कर्ज व व्याज यांची परतफेड (*)

(अ) इएमआयची (समान मासिक हप्ते) रक्कम :

(ब) कर्ज समान मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करावयाचे असते तेव्हा असणारी हप्त्यांची एकूण संख्या :

* कर्जदार आणि एचडीएफसी यांच्यामध्ये करण्यात आलेल्या / करण्यात यावयाच्या कर्जाच्या करारामधील शर्तींनुसार फेरफार होण्याच्या अधीन. एचडीएफसी आपली अधिकृत वेबसाईट (www.hdfc.com), वार्षिक लेखाविवरणे, कार्यालयामध्ये प्रसिध्द होणाऱ्या सूचना व प्रसंगोपात करण्यात येणाऱ्या सर्वसाधारण घोषणा यांच्याद्वारे व्याजदरात होणारे कोणत्याही प्रकारचे बदल आपल्या कर्जदारांना कळवित राहण्याचा प्रयत्न करतील. जर अशाप्रकारचे कोणत्याही प्रकारचे बदल ग्राहकाच्या दृष्टीने तोट्याचे (गैरसोयीचे) असतील तर तो/ती ६० दिवसांच्या आत कोणत्याही सूचनेशिवाय त्याचे/तिचे खाते बंद करू शकेल किंवा कोणतेही अतिरिक्त भार अथवा व्याज द्यावे न लागता बदलून टाकू (स्वीच) शकेल.

५. कर्जाचा कालावधी :

६. कर्जाचा हेतू (कोणत्या कारणासाठी कर्ज मंजूर करण्यात आले आहे) :

७. कर्जासाठी तारण/सममूल्य मालमत्ता (*)

कर्जासाठी असणारे तारण हे सर्वसामान्यतः कर्जपुरवठा करण्यात येणारी मालमत्ता आणि / किंवा इतर कोणतीही सममूल्य तारण मालमत्ता / अंतरीम तारण यापैकी एचडीएफसी कडून आवश्यक असणाऱ्या बाबीवरील सिक्युरीटी इंटरेस्ट हे असेल.

(अ) मालमत्तेचे वर्णन :

(ब) हमीदार : हमीदारांची नावे (असल्यास) :

(क) इतर तारण हितसंबंधित (असल्यास) :

८. शुल्क आणि इतर भार

अ. अर्ज करण्यासाठी/कर्जाच्या कालावधी दरम्यान/व्याजाच्या रूपांतरणाचे व त्याउलट प्रक्रियेचे शुल्क/पैसे भरणा करण्यास विलंब झाल्याबद्दल लागू होणारा दंड इत्यांदीसाठी लागू होणारे शुल्क व इतर भार खाली दिल्यानुसार आहेत:

| अनु. क्र. | उत्पादन सेवा यांचे नाव | लावण्यात येणारे शुल्क/ आकारणी यांचे नाव | केव्हा देय असते | वारंवारिता | रुपयांमध्ये रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ अ | पगारदार, स्वयंरोजगारावरील व्यावसायीक यांना घरखरेदी/विस्तार/सुधारणा (दुरूस्ती)/ रिफायनान्स/ जमीन खरेदी यांच्या कर्जासाठी शुल्क | प्रक्रिया शुल्क | अर्ज करण्याच्या वेळेस | एकदा | कर्जाच्या रकमेच्या ०.५०% पर्यंत किंवा रू. ३०००/– यापैकी जास्त असणारी रक्कम + कर व वैधानिक आकारणी व भार अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. किमान धारणा रक्कम रू. ३०००/– |
| १ ब | बिगर गृहकर्जे/त्यांच्यामधील वाढ/बिगर गृहकर्जातील सुधारणा/बिगर गृहकर्जासाठी/ (पगारदार, स्वयंरोजगारावरील व्यक्ति, व्यावसायीक यांना) बिगर गृहकर्जे, भूखंडासाठी कर्जे यांना पुन्हा कर्ज पुरवठा | प्रक्रिया शुल्क | अर्ज करण्याच्या वेळेस | एकदा | कर्जाच्या रकमेच्या ०.५०% पर्यंत किंवा रू. ४५००/– यापैकी जास्त असणारी रक्कम + कर व वैधानिक आकारणी व भार अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. किमान धारणा रक्कम रू. ४५००/– |
| २ | स्वयंरोजगारावरील बिगर व्यावसायीकांना घरखरेदी/विस्तार/दुरूस्ती/ रिफायनान्स/जमीन खरेदी, यांच्या कर्जासाठी शुल्क | प्रक्रिया शुल्क | अर्ज करण्याच्या वेळेस | एकदा | कर्जाच्या रकमेच्या १.५०% पर्यंत किंवा रू. ४५००/– यापैकी मोठी असणारी रक्कम + कर व वैधानिक आकारणी व भार अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. किमान धारणा रक्कम रू. ४५००/– |
| ३ अ | कर्ज टॉप–अप साठी शुल्क (पगारदार, स्वयंरोजगारावरील व्यावसायीक) | प्रक्रिया शुल्क | अर्ज करण्याच्या वेळेस | एकदा | कर्जाच्या रकमेच्या ०.५०% पर्यंत किंवा रू. ३०००/– यापैकी जास्त असणारी रक्कम + कर व वैधानिक आकारणी व भार अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. किमान धारणा रक्कम रू. ३०००/– |
| ३ ब | कर्ज टॉप–अप साठी शुल्क (पगारदार, स्वयंरोजगारावरील बिगर व्यावसायीक) | प्रक्रिया शुल्क | अर्ज करण्याच्या वेळेस | एकदा | कर्जाच्या रकमेच्या १.५०% पर्यंत किंवा रू. ४५००/– यापैकी जास्त असणारी रक्कम + कर व वैधानिक आकारणी व भार अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. किमान धारणा रक्कम रू. ४५००/– |
| ४ | इक्विटी/अनिवासी जागा यांच्या कर्जासाठी शुल्क | प्रक्रिया शुल्क | अर्ज करताना | एकदा | कर्जाच्या रकमेच्या १.५०% पर्यंत किंवा रू. ४५००/– यापैकी जास्त असणारी रक्कम + कर व वैधानिक आकारणी व भार अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. किमान धारणा रक्कम रू. ४५००/– |
| ५ | एनआरआय (अनिवासी भारतीयांच्या) कर्जासाठी शुल्क | प्रक्रिया शुल्क | अर्ज करताना | एकदा | कर्जाच्या रकमेच्या १.२५% पर्यंत किंवा रू. ३०००/– यापैकी जास्त असणारी रक्कम + कर व वैधानिक आकारणी व भार अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. किमान धारणा रक्कम रू. ३०००/– |
| ६ | मूल्यवर्धित (व्हॅल्यू प्लस) कर्जासाठी शुल्क | प्रक्रिया शुल्क | अर्ज करताना | एकदा | कर्जाच्या रकमेच्या १.५०% पर्यंत किंवा रू. ३०००/– यापैकी जास्त असणारी रक्कम + कर व वैधानिक आकारणी व भार अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. |
| ७ | एचडीएफसी रीच स्कीम अंतर्गत कर्जासाठी शुल्क | प्रक्रिया शुल्क | अर्ज करताना | एकदा | कर्जाच्या रकमेच्या १.५०% पर्यंत + कर व वैधानिक आकारणी आणि अशी प्रसंगोपात लागू होणारी रक्कम. |

| अनु. क्र. | उत्पादन सेवा यांचे नाव | लावण्यात येणारे शुल्क/ आकारणी यांचे नाव | केव्हा देय असते | वारंवारिता | रुपयांमध्ये रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ८ | पैसे देण्यातील विलंबाबद्दल शुल्क | अतिरिक्त व्याज | जमा झाल्याने झालेली वाढ | मासिक | थकबाकी रकमेवर कमाल १८%. |
| ९ | खर्च वसुल करण्याची किंमत | प्रासंगिक भार | झालेल्या खर्चावर | | लागू होणाऱ्या प्रसंगानुसार खर्च, भार, नुकसान व इतर खर्च झालेले पैसे वसून करण्यासाठी प्रासंगिक भार व खर्च आकारले जातात. |
| १० | वैधानिक शुल्क | सीइआरएसएआय | तारण्याचे वितरण/ बदल यासाठी | एकदा | सीइआरएसएआयने आकारल्यानुसार भार घेतला जातो. |
| ११ | वैधानिक शुल्क | मुद्रांक शुल्क/ एमओडी/एमओइ | वाटप निश्चित करण्यावर | एकदा | संबंधित राज्यामध्ये लागू असेल त्यानुसार. |
| १२ | बदलत्या दराच्या कर्जामध्ये कमी दरात बदल करून घेणे (गृहकर्ज/ विस्तार /दुरूस्ती) | रूपांतरण शुल्क | रूपांतरण झाल्यावर | प्रत्येक विस्तारीत बदलासाठी | रूपांतरण वेळेस थकबाकी असणाऱ्या मुद्दलाची रक्कम आणि (असल्यास) वितरीत न झालेली रक्कम यांच्या ०.५०% पर्यंत किंवा रू. ५००००/– भांडवली रक्कम अधिक कर यापैकी कमी असणारी रक्कम. |
| १३ | व्हेरिएबल रेट लोन मधून फिक्स्ड रेट लोनमध्ये बदल करून घेणे (गृहकर्ज/विस्तार/दुरूस्ती) | रूपांतरण शुल्क | रूपांतरण झाल्यावर | एकदा | रूपांतरणच्या वेळेस थकबाकी असणाऱ्या मुद्दलाची रक्कम यांच्या ०.५०% पर्यंत किंवा रू. ५००००/– भांडवली रक्कम अधिक कर यापैकी कमी असणारी रक्कम. |
| १४ | ट्रुफिक्स्ड फिक्स्ड रेटमधून व्हेरिएबल रेटमध्ये बदल | रूपांतरण शुल्क | रूपांतरण झाल्यावर | एकदा | मुद्दलाची थकबाकी रक्कम आणि वितरीत न झालेली रक्कम (असल्यास) याच्या १.७५% अधिक रूपांतरणाच्या वेळेस असणारे कर. |
| १५ | कमी दरामध्ये बदल (बिगर गृहकर्जे) | रूपांतरण शुल्क | रूपांतरण झाल्यावर | विस्तृत बदलास | मुद्दलाची थकबाकी आणि (असल्यास) यातील विभाजीत फकाच्या अर्धी अधिक कर यामध्ये किमान शुल्क ०.५०% आणि कमाल १.५०% असेल. |
| १६ | कमी दरामध्ये बदल (जमीनीसाठी कर्ज) | रूपांतरण शुल्क | रूपांतरण झाल्यावर | प्रत्येक विस्तृत बदलास | थकबाकी मुद्दल आणि वितरीत न झालेली रक्कम (असल्यास) याच्या ०.५०% अधिक रूपांतरणाच्या वेळेस असणारे कर. |
| १७ | धनादेश/इसीएस न वटविले गेल्याचा भार | किरकोळ प्राप्ती | धनादेश वटविला न गेल्यावर | वटविले न जाण्याच्या संख्यांवर अवलंबून | वटविले न जाण्याच्या प्रत्येक प्रसंगी रू. २००/– |
| १८ | दस्तऐवजांची छायांकीत प्रत | किरकोळ प्राप्ती | प्रसंगा नुसार | प्रत्येक विनंतीस | रू. ५००/– पर्यंत अधिक कर |
| १९ | बाहेरून मत मागविण्यासाठी शुल्क | किरकोळ प्राप्ती | झालेल्या खर्चानुसार | – | प्रत्यक्ष खर्चानुसार |
| २० | दस्तऐवजांची यादी | किरकोळ प्राप्ती | प्रसंगा नुसार | प्रत्येक विनंतीस | रू. ५००/– अधिक कर |
| २१ | पीडीसी स्वॅप | किरकोळ प्राप्ती | प्रसंगा नुसार | प्रत्येक विनंतीस | रू. ५००/– अधिक कर |
| २२ | वितरण झाल्यानंतर वितरणाचा धनादेश रद्द झाल्याचे शुल्क | किरकोळ प्राप्ती | प्रसंगा नुसार | प्रत्येक घटनेस | रू. ५००/– अधिक कर |
| २३ | मंजुरीनंतर ६ महिन्यांनी कर्जाचे पुनर्मूल्यांकन | प्रक्रिया शुल्क | प्रत्येक नवीन अर्जासाठी | एकदा | रू. २०००/– अधिक कर आणि वैधानिक आकारणी व भार वेळोवेळी लागू होतील त्यानुसार |
| २४ | कर्जाच्या रकमेत वाढ/घट | प्रक्रिया शुल्क | विनंतीच्या वेळेस | एकदा | रू. ५००/– अधिक कर आणि वेळोवेळी लागू होतील त्यानुसार वैधानिक आकार आणि भार |

**बी. फोरक्लोझर / प्रीपेमेन्ट चार्जेस विषयी**

| | | |
|---|---|---|
| १. | **ए. व्हेरिएबल रेट ऑफ इंटरेस्ट लागू होण्याच्या कालावधी दरम्यान ॲडजस्टेबल रेट लोन्स (एआरएचएल)**<br>**आणि**<br>**कॉम्बिनेशन रेट होमलोन ('सीआरएचएल')** | **अ) वैयक्तिक कर्जदारांसाठी :**<br>व्यक्तिगत कर्जदारांसाठीच मंजूर झालेल्या सर्व कर्जाच्या संदर्भात कोणत्याही मार्गाने केलेल्या कर्जाच्या अंशिक अथवा संपूर्ण प्रीपेमेन्टसाठी कोणतेही प्रीपेमेन्ट चार्जेस देय असणार नाहीत.<br>**आ) वैयक्तिक कर्जदारांव्यतिरिक्त इतरांसाठी :** कंपनी / स्वत:च्या मालकीची प्रोपायटर कन्सर्न / फर्म किंवा एचयूएफ हे सहअर्जदार असताना मंजूर केलेल्या सर्व कर्जांच्या संदर्भात :<br>i. कर्जाचे पहिले वितरण झाल्याच्या तारखेपासून पहिल्या सहा (६) महिन्यांच्या आत कर्ज प्रीपेड करण्यात आले असल्यास प्रीपेड करण्यात आलेल्या रकमेवर २% दर अधिक कर व वैधानिक आकार आणि शुल्क एवढे प्री पेमेन्ट चार्जेस लावण्यात येतील.<br>ii. पहिले सहा (६) महिने संपल्यानंतर व ३६ महिने पर्यंत कर्जदाराकडे कोणतेही प्री पेमेन्ट चार्जेस न देता प्रत्येक आर्थिक वर्षास कर्जाच्या सुरु होणाऱ्या वेळच्या मुद्दल रकमेच्या २५% पर्यंतची रक्कम परतफेड करण्याचा पर्याय असेल. अशाप्रकारे करण्यात येणारे प्रीपेमेन्ट हे कर्जदाराच्या स्वत:च्या स्त्रोतांमधून* करणे गरजेचे असेल.<br>प्रत्येक वित्तिय वर्षामध्ये २५% या मर्यादेपेक्षा जास्त असणाऱ्या २५% वरील प्रिपेड केलेल्या रकमांवर २% एवढे प्रिपेमेन्ट चार्जेस लागू होतील.<br>३६ महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर स्वत:च्या स्त्रोतांमधून कर्ज प्रीपेड करण्यात येत असेल तर कोणतेही प्री पेमेन्ट चार्जेस लागू होणार नाहीत. तथापि रिफायनान्स द्वारे कर्ज प्रीपेड करण्यात येत असेल तर कर्जदार प्री पेमेन्ट चार्जेस देण्यास उत्तरदायी असेल.<br>ई) कर्जाच्या प्रीपेमेन्टच्या वेळेस पैशांचा स्त्रोत निश्चित करण्याच्या दृष्टीने एचडीएफसीला उचित आणि योग्य वाटतील अशी सर्व कागदपत्रे ग्राहकाला सादर करावी लागतील.<br>*या दृष्टीने 'स्वत:चे स्त्रोत' या संज्ञेचा अर्थ कोणतीही बँक/एच एफ सी/एन बी एफसी किंवा वित्तिय संस्था यांच्याकडून कर्ज घेणे यापेक्षा इतर कोणताही स्त्रोत असा होतो.<br>या कर्जाच्या कराराच्या अंमलबजावणीच्या तारखेस वर नमूद केल्यानुसार प्रीपेमेन्ट चार्जेस लागू असतील. तथापि, ते एच डी एफ सी च्या प्रचलित पॉलिसींच्या अनुसार बदल होण्याच्या अधीन आहेत आणि त्यांच्यामध्ये प्रसंगानुसार बदल होऊ शकतील. प्रीपेमेन्टससाठी लागू असणाऱ्या सर्वात अलिकडील चार्जेससाठी ग्राहकांनी www.hdfc.com पहावे अशी विनंती आहे. |
| २. | **बी. फिक्स्ड रेट ऑफ इन्टरेस्ट लागू होण्याच्या कालावधी दरम्यान फिक्स्ड रेट लोन्स ('एफआरएचएल')**<br>**आणि**<br>**कॉम्बिनेशन रेट होम लोन('सीआरएचएल')** | **अ) वैयक्तिक कर्जदारांसाठी :**<br>वितरण करण्यात आलेल्या सर्व कर्जाबाबत कोणतीही बँक/एचएफसी/एनबीएफसी किंवा वित्तिय संस्था यांच्या मार्फत रिफायनान्स घेऊन आणि स्वत:चे स्त्रोत* नसणाऱ्या प्रिपेड करण्यात येणाऱ्या या रकमांवर (या रकमांमध्ये त्या विशिष्ट वित्तिय वर्षात प्रिपेड करण्यात आलेल्या सर्व रकमा समाविष्ट असतील) २% दराने प्री पेमेन्ट चार्जेस अधिक लागू होणारे कर आणि वैधानिक आकार व शुल्क असे प्रिपेमेन्ट चार्जेस लागू करण्यात येतील, तसेच ते सर्व प्रकारच्या आंशिक व संपूर्ण प्रिपेमेन्टसाठी लागू असतील.<br>**आ) वैयक्तिक कर्जदार नसणाऱ्या इतरांसाठी –** कंपनी/स्वत:च्या मालकीची प्रोप्रायटर कन्सर्न/फर्म किंवा एच यू एफ (हिंदू अविभक्त कुटुंब) हे सह–अर्जदार असतांना मंजूर केलेल्या सर्व कर्जाच्या संदर्भात:<br>i. कर्जाचे पहिले वितरण झाल्याच्या तारखेपासून पहिल्या सहा (६) महिन्यांच्या आत कर्ज प्रिपेड करण्यात आले असल्यास प्रिपेड करण्यात आलेल्या रकमेवर २% दर अधिक कर व वैधानिक आकार आणि शुल्क एवढे प्रीपेमेन्ट चार्जेस लावण्यात येतील.<br>ii. पहिले सहा (६) महिने संपल्यानंतर व ३६ महिने पर्यंत कर्जदाराकडे कोणतेही प्रीपेमेन्ट चार्जेस न देता प्रत्येक वित्तिय वर्षात कर्ज सुरु होण्याच्या वेळेच्या मुद्दल रकमेच्या २५% पर्यंतची रक्कम परतफेड करण्याचा पर्याय असेल. अशाप्रकारे करण्यात येणारे प्रीपेमेन्ट कर्जदाराच्या स्वत:च्या स्त्रोतांमधून करणे गरजेचे असेल.<br>प्रत्येक वित्तिय वर्षामध्ये २५% या मर्यादेपेक्षा जास्त असणाऱ्या २५% वरील प्रिपेड केलेल्या रकमांवर २% एवढे प्रिपेमेन्ट चार्जेस लागू होतील.<br>३६ महिन्यांचा कालावधी संपल्यावर जर कर्ज स्वत:च्या स्त्रोतांमधून प्रीपेड करण्यात येत असेल तर कोणतेही प्रीपेड जार्चेस लागू होणार नाहीत. तथापि, रिफायनान्सद्वारे कर्ज प्रीपेड करण्यात येत असेल तर कर्जदार प्रीपेमेन्ट चार्जेस देण्यास उत्तरदायी असेल.<br>ई) कर्जाच्या प्रीपेमेन्टच्या वेळेस पैशाचा स्त्रोत निश्चित करण्याच्या दृष्टिने एचडीएफसीला उचित व योग्य वाटणारी सर्व कागदपत्रे ग्राहकाला सादर करावी लागतील.<br>*या दृष्टीने 'स्वत:चे स्त्रोत' या संज्ञेचा अर्थ कोणतीही बँक/एच एफ सी/एन बी एफसी किंवा वित्तिय संस्था यांच्याकडून कर्ज घेणे यापेक्षा इतर कोणतीही स्त्रोत असा होतो.<br>या कर्जाच्या कराराच्या अंमलबजावणीच्या तारखेस वर नमूद केल्यानुसार प्रीपेमेन्ट चार्जेस लागू असतील. तथापि, ते एच डी एफ सी च्या प्रचलित पॉलिसींच्या अनुसार बदल होण्याच्या अधीन आहेत आणि त्यांच्यामध्ये प्रसंगानुसार बदल होऊ शकतील. प्रीपेमेन्टससाठी लागू असणाऱ्या सर्वात अलिकडील चार्जेससाठी ग्राहकांनी www.hdfc.com पहावे अशी विनंती आहे. |

क. कर्ज मंजूरी / वाटप न झाल्यास परत मिळणारे शुल्क

कर्ज मिळविण्यासाठी ग्राहकाकडून देण्यात आलेले प्रक्रिया शुल्क हे वरील कोष्टकामध्ये कर्जाच्या विशिष्ट वर्गवारीसमोर एचडीएफसी बँकेकडून निर्देशित केलेल्या किमान धारणा रकमेच्या अधिन परत मिळू शकेल एवढे आहे.

९. (अ) मालमत्तेचा विमा

कर्जदाराने या गोष्टीची खातरजमा करून घ्यावी की कर्ज शिल्लक असण्याच्या कालावधीमध्ये संबंधित मालमत्तेचा भूकंप, आग, पूर, स्फोट, वादळ, तूफान, चक्रीवादळ, नागरी उठाव इत्यादी सारख्या सर्व प्रकारच्या जोखमींबाबत नेहमीच व्यवस्थित आणि सुयोग्यरीत्या विमा उतरविलेला असून सदर पॉलिसी / पॉलिसीज यांच्या अंतर्गत एचडीएफसी हे संपूर्ण आणि एकमेव लाभधारक बनविण्यात आलेले आहेत.

(ब) कर्जदाराचा विमा

कर्जदाराने स्वतःसाठी त्याचे आरोग्य आणि / किंवा जीवन यांच्या संदर्भात स्वतःला संरक्षण मिळविण्यासाठी विमा काढलेला असावा आणि सदर पॉलिसी/पॉलिसीज् यांच्या अंतर्गत एचडीएफसी हे संपूर्ण आणि एकमेव लाभधारक नेमण्यात आलेले असावेत.

१०. कर्जाचे वाटप करण्यासाठी शर्ती

कर्जदाराने पुढील गोष्टी कराव्यात :

अ. कर्ज मंजुरीचे पत्र/कर्जाचा करार यामध्ये नमूद केलेले सर्व प्रकारचे संबंधित दस्तऐवज सादर करावेत.

ब. त्याची नोकरी/संपर्क यांच्या तपशीलामध्ये कोणत्याही प्रकारचा बदर झाल्यास एचडीएफसीला कळवावे.

क. कर्जाचे वाटप करण्यासाठी (एचडीएफसीने नमूद केलेल्या पध्दतीनुसार) लेखी विनंती करावी. अशाप्रकारची विनंती ही जेव्हा लेखी स्वरूपात, मेलद्वारे किंवा एचडीएफसीची वेबसाईट (www.hdfc.com) द्वारे अथवा एचडीएफसी कडून प्रसंगोपात घोषित करण्यात आलेली इतर कोणतीही पध्दती/प्रकार यांच्या द्वारे करण्यात आलेली असल्यास योग्यप्रकारे केल्याचे समजण्यात येईल.

ड. कर्जमंजुरीच्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार कर्जाचे वाटप होण्यासाठी असणाऱ्या सर्व पूर्व शर्तींची पूर्तता करणे.

इ त्याच्या (तारण) मालमत्तेवर त्याचा संपूर्ण सुस्पष्ट आणि विक्री करण्यायोग्य सनदी हक्क आहे आणि कथित मालमत्ता ही कुठल्याही प्रकारच्या कोणत्याही दायित्वापासून मुक्त व संपूर्णतः कोणत्याही प्रकारचा दावा नसलेली आहे याची त्याने खातरजमा करुन घ्यावी.

फ वर्तमान कर्जाच्या कराराअंतर्गत त्याच्या कर्तव्यांचे पालन करणे कर्जदारास अशक्य होऊ शकेल अशा प्रकारची कोणतीही 'असाधारण' अथवा इतर प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली नाही याची खात्री करुन घ्यावी.

ग कर्जदाराकडून अमंलबजावणी झालेल्या/होऊ घातलेल्या कर्जाच्या कराराच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची थकबाकीची घटना घडलेली नाही याची खातरजमा करुन घेणे.

ह होम इक्विटी लोन्स, नॉन–रेसिडेन्शियल प्रिमायसेस लोन आणि टॉप अप लोन्स यांचा अपवाद करता इतर सर्व कर्जासाठी खालील शर्ती लागू होतील.

कर्जदाराने पुढील गोष्टी कराव्यातः

(१) कर्जमंजुरीच्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार स्वतःच्या योगदानाची रक्कम (सदानिकेची एकूण किंमत वजा कर्जाची रक्कम) भरणे.

(२) बांधकामाची प्रगती/विलंब, मालमत्तेला झालेली कोणतीही महत्त्वाची हानी, मालमत्तेशी संबंधित प्रसंगोपात लागू होतील त्यानुसार असणारे कर व वैधानिक आकार आणि भार यांचे पैसे न देणे यांच्या तपशीलाच्या समावेशासह एचडीएफसीला सर्व माहिती नियमितपणे पुरविणे.

(३) मंजूर झालेल्या प्लॅननुसार बांधकाम सुरू करण्यात आलेले आहे आणि विकासकाने (मालमत्तेच्या पुनर्विक्रीच्या संदर्भात विक्री करणाऱ्याने) प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या मंजूरी मिळविल्या आहेत याविषयी त्याचे/तिचे स्वतःचे समाधान झाले आहे, याची खातरजमा करुन घेणे.

(४) कर्जाच्या रकमेच्या आधी झालेल्या वाटपाच्या रकमेच्या वापराविषयी एचडीएफसीचे समाधान करणे आणि त्याविषयी पुरेसा पुरावा पुरविणे

११. थकबाकीच्या वसुलीसाठी पालन करावयाची साररूपातील कार्यपद्धती:

कर्जाचा कालावधी, हप्त्याची नियमितता, रक्कम, कर्जाच्या परतफेडीची पध्दती यांच्या बाबतीत कर्जाच्या परतफेडीची प्रक्रिया ग्राहकांना समजावून सांगण्यात येते. देय तारखेस नियमितपणे इएमआय किंवा पीइएमआय भरण्याच्या त्यांच्या/तिच्या जबाबदारी विषयी ग्राहकाला कोणतीही सूचना, स्मृतीपत्र, अथवा माहिती देण्यात येत नाही.

देय तारखेस प्री–इएमआय/इएमआय यांचा भरणा न केला गेल्यास एचडीएफसी ग्राहकाला दूरध्वनी करुन, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून लेखी सूचना पाठवून अथवा ग्राहकाने दिलेल्या पत्त्यावर एचडीएफसीच्या अधिकृत अधिकाऱ्याद्वारे व्यक्तिशः भेट देऊन आठवण करून देईल. अशा प्रकारचे दूरध्वनी/पत्रव्यवहार/भेटी यांचा खर्च ग्राहकाकडून वसुल करण्यात येईल.

येथे काहीही नमूद केलेले असले तरी, देय तारखेस प्रि–इएमआय/इएमआय यांची रक्कम नियमितपणे दिली जात आहे, याची खातरजमा करून घेणे, हे ग्राहकाचे उत्तरदायित्व असेल.

कोणत्याही ग्राहकाच्या खात्याविषयीची क्रेडिटची माहिती क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्यूरों (इंडिया) लिमिटेड (सीआयबीआयएल) किंवा इतर परवाना देण्यात आलेल्या संस्था (ब्युरो) यांना मासिक तत्वावर नियमितपणे कळविण्यात येते. सीआयबीआयएल यांच्याकडील क्रेडिटच्या इतिहासावर होणारा कोणताही विपरीत परिणाम टाळण्यासाठी ग्राहकाने कर्जाच्या रकमेवर देय असणारी हप्त्याची रक्कम वेळचेवेळी भरणा केली जात आहे याची खातरजमा करुन घ्यावी, असे कळविण्यात येत आहे.

गहाण/तारण यांची अंमलबजावणी करुन वसूली करण्याच्या पध्दतीमध्ये सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट, २००२ (सारफेसी ॲक्ट) मध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा कबजा घेणे व तिची विक्री करणे याचा समावेश असेल परंतु ही कारवाई तेवढ्या पुरतीच मर्यादित नसेल.

किंवा इतर कोणत्याही कायद्याअंतर्गत होणाऱ्या कारवाईचे पालन पूर्णतः संबंधित कायद्यामध्ये निर्देशित केलेल्या निर्देशानुसार करण्यात येईल. निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट ॲक्ट, दिवाणी स्वरूपाचा तसेच सारफेसी ॲक्ट अंतर्गत होणारा दावा याद्वारे थकबाकीची वसुली करण्यासाठी पावले उचलण्यापूर्वी ग्राहकाला माहिती/स्मरणपत्रे/सूचना पाठविण्यात येतील.

१२. थकबाकीच्या ताळेबंदाचे विवरण सादर करण्याची तारीख : ग्राहकाच्या विनंतीनुसार

१३. ग्राहक सेवा

१) दस्तऐवजांच्या आवश्यकतांचा समावेश असण्यासह ग्राहकसेवा विषयक चौकश्या ह्या पुढील मार्गांनी एचडीएफसी कडे केल्या जाऊ शकतात:
आमच्या वेबसाईट: www.hdfc.com वर आमच्याशी पत्रव्यवहार करा किंवा आम्हाला येथे कळवा:
एचडीएफसी लिमिटेड, एचडीएफसी हाऊस, एच.टी पारेख मार्ग, १६५–१६६, ब्लॅकबे रेक्लेमेशन, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.

२) एचडीएफसीच्या सर्व शाखांच्या संदर्भातील भेट देण्याच्या वेळा व ग्राहकसेवेसाठी संपर्क करावयाच्या व्यक्तीचे तपशील हे www.hdfc.com वर उपलब्ध आहेत.

३) तुमच्या सर्वात जवळच्या शाखेतील एचडीएफसी ग्राहकसेवा अधिकाऱ्याशी कामकाजाच्या वेळेत कर्जाच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या पुढील गोष्टींसाठी संपर्क साधा:

अ दस्तऐवजांच्या फोटोकॉपी, ज्या विनंती केल्याच्या तारखेपासून कामकाजाच्या ७ दिवसांच्या आत दिल्या जाऊ शकतात. आवश्यक ते प्रशासकीय शुल्क लागू होईल.

ब मूळ दस्तऐवज कर्जसमाप्तीच्या तारखेपासून कामकाजाच्या १० दिवसांच्या आत परत करण्यात येतील. दस्तऐवज मुक्त होण्याच्या तारखेनंतर दस्तऐवज गोळा केल्यास आवश्यक प्रशासकीय शुल्क लागू होईल.

क कर्जखात्याचे विवरण (कालमर्यादा) : विनंती केल्यापासून कामकाजाच्या तीन दिवसांच्या आत

१४. तक्रार निवारण:

असे काही प्रसंग निर्माण होऊ शकतात की जेथे कर्जदाराचे मिळालेल्या सेवेमूळे समाधान होत नाही, असे प्रसंग उजेडात आणण्यासाठी व तक्रार नोंदविण्यासाठी कर्जदारांनी पुढील कार्यपध्दतीचे पालन करावे:

अ) कर्जदार ग्राहकसेवा विभागाकडे www.hdfc.com वरुन तक्रार करु शकतो किंवा

ब) कर्जदार व्यवहार करणाऱ्या संबंधित शाखेच्या बिझिनेस हेडची भेट घेऊन शकतो किंवा त्याच्याशी पत्रव्यवहार करु शकतो.

क) ७ दिवसांच्या कालावधी पलिकडे देखील तक्रारीचे निवारण झाले नाही तर कर्जदार ही बाब व्यवस्थापकीय संचालकाकडे पुढील पत्त्यावर कळवू शकतात.
व्यवस्थापकीय संचालक,
एचडीएफसी लिमिटेड, एचडीएफसी हाऊस, एच टी पारेख मार्ग, १६५–१६६, बॅकबे रेक्लमेशन, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.

ड) मिळालेल्या उत्तराने कर्जदाराचे तरीदेखील समाधान झाले नसेल तर तक्रारदार नॅशनल हाऊसिंग बँक तक्रार निवारण कक्षाकडे लिंक https://grids.nhbonline.org.in वरून ऑनलाईन पद्धतीने किंवा लिंक http://www.nhb.org.in/Grievance-Redressal-System/Lodging-Complaint-Against-HFCs-NHB%E2%80%93Physical-Mode.pdf वर उपलब्ध असणाऱ्या विहीत नमुन्यामध्ये,

ऑफलाईन पध्दतीने छापील स्वरूपात तक्रार निवारण कक्ष, डिपार्टमेन्ट ऑफ रेग्युलेशन अॅण्ड सुपरव्हिजन, नॅशनल हाऊसिंग बँक, ४ था मजला, कोअर ५ ए, इंडिया हॅबिट्ट सेंटर, लोधी रोड, नवी दिल्ली – ११० ०२३ येथे आपली तक्रार पाठवू शकतो.

याद्वारे येथे मंजुर करण्यात येत आहे की कर्जाच्या सविस्तर अटी आणि शर्ती यांच्या संदर्भात उभयपक्ष त्यांच्याकडून अंमलबजावणी करण्यात आलेल्या/करण्यात यावयाच्या कर्ज व इतर तारण दस्तऐवज यांचा आधार घेतील आणि त्यांच्यावर विश्वास ठेवतील. वरील अटी आणि शर्ती ह्या कर्जदाराने वाचल्या आहेत/एचडीएफसीच्या श्री/श्रीमती ______________________________
यांनी कर्जदाराला वाचून दाखविलेल्या आहेत आणि त्या कर्जदाराला समजल्या आहेत.

______________________________
(कर्जदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

______________________________
(एचडीएफसीच्या अधिकृत व्यक्तिची सही)